पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २०

**सभावृत्तांत**

दिनांक - **१७/०७/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१७/०७/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
६) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
७) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
८) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) प्रभाग क्र.६ मोशी, बो-हाडेवाडी येथील वाघेश्वर मंदिराजवळ बांधण्यात आलेल्या समाजमंदिराची किरकोळ स्थापत्य विषयक कामे करणे या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.२९ से.क्र.२ मोकळी जागा क्र.८ येथे जेष्ठ नागरिकांसाठी मनोरंजन केंद्र बांधणे कामाच्या सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.शकुंतला बनसोडे.

----------

अ) दिनांक ०५/१२/२०१४ व १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ९)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ०२/०१/२०१५, १६/०१/२०१५ व ०६/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्र.१०**) सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ड) दिनांक १६/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ११)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक ३१/०१/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

फ) दिनांक ०६/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १३)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ग) दिनांक २०/०२/२०१५, ०३/०३/२०१५(स.१०.४५ व दु.२.०० वा), २०/०३/२०१५ व २६/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १४)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ह) दिनांक २०/०३/२०१५ व २६/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १५)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ई) दिनांक ०४/०४/२०१५ व १७/०४/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

छ) दिनांक ०२/०५/२०१५, ०५/०५/२०१५, १५/०५/२०१५ व ०५/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १७)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ज) दिनांक ०५/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १८)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

झ) दिनांक १९/०६/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १९)** सभावृत्तांत पुढील सभेच्यावेळी कायम करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १०० विषय क्रमांक : १

दिनांक : १७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य

सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक : मा.संजय वाबळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/१२६/२०१५, दि.१९/०५/२०१५

विषय – प्रभाग क्रमांक १७ श्री ज्ञानेश्वर उद्यानातील सिमाभिंतीचे नुतनीकरण करणे.

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०१ विषय क्रमांक : २

दिनांक : १७/०७/२०१५ विभाग – स्थापत्य क क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/२१७०/२०१५, दि.२१/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४१ गांधीनगर येथील पिंपरी चौकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयास उतरणेस शिडी (जिना) करणेचे काम निविदा क्र.२५/०६/२०१३-१४ अन्वये सध्या चालू आहे. सदर कामाअंतर्गत पुतळयास आर.सी.सी.मध्ये शिडी करण्यात येणार आहे. प्रस्तुत काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा उद्यानामधील असून सदर ठिकाणी हे पूर्वीच्या खाणीच्या ठिकाणी असलेने पाया खोदताना खाणीतील भराव मोठया प्रमाणामध्ये काढावा लागल्याने तसेच त्यानुसार आर.सी.सी.डिझाईन करावे लागल्याने कामाच्या खर्चामध्ये वाढ झाली आहे. तसेच वास्तूशास्त्रज्ञाकडील नियोजित भिमसृष्टीच्या डिझाईननुसार शिडी(जिना) चढण्याकरिता व उतरणेकरिता वेगवेगळी बनवावी लागल्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत काम ३५% पुर्ण झाले असून प्रगतीपथावर आहे. त्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रकास सुधारित मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याकामी सुधारित अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१२-१३ च्या दरसुचीनुसार काढणेत आले असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.४८,५०,०००/- इतकी येत आहे. तरी विषयांकित कामासाठी येणा-या र.रु.३६,५०,०००/- चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १०२ विषय क्रमांक : ३

दिनांक : १७/०७/२०१५

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.६ मोशी बो-हाडेवाडी येथील मंदिराजवळ बांधण्यात आलेल्या समाजमंदिराचे काम पुर्ण होऊन सुमारे ७ वर्षे झालेली आहेत. त्यामुळे समाजमंदिराची रंगरंगोटी करणे, ग्रीलची, खिडक्यांची, दरवाज्यांची दुरुस्ती करणे, समाजमंदिरा समोर ओटा बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी र.रु.१२,००,०००/- एवढी तरतूद आहे. सबब या कामासाठी र.रु.२५,००,०००/- एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १०३ विषय क्रमांक : ४

दिनांक : १७/०७/२०१५

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.२९, से.क्र.२ मधील मोकळी जागा क्र.८ येथे जेष्ठ नागरिकांसाठी मनोरंजन केंद्र बांधणेचे काम सध्या चालू आहे. सदर कामामध्ये प्लॉटचे सपाटीकरण, सिमाभिंत व गेटची दुरुस्ती करणेही आवश्यक आहे. त्यामुळे कामाचे खर्चामध्ये वाढ होणार आहे. सदर प्लॉट सपाटीकरण व सिमाभिंत दुरुस्ती या कामाची वाढ गृहित धरल्यास साधारणपणे र.रु.४९,५०,०००/- इतका सुधारित खर्च अपेक्षित आहे. (र.रु.४९,५०,०००/- – ३०,००,०००/- = १९,५०,०००/- वाढीव). सदर कामाचे र.रु.४९,५०,०००/- चे सुधारीत खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५४७/२०१५
दिनांक : २१/०७/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.